**MS-CIT**
World-class Comprehensive Computer Course

# Model Answer
## Set- III
**Std. – 10th MM/Semi**
**Subject – History H.L.**

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

---

**Time : 2 Hrs.** **Marks : 40**

**प्र.१ अ) दिलेल्यापर्यायांपैकीयोग्यपर्यायनिवडूनविधानेपूर्णकरा:**

१) अ) पहिला फ्रान्सिस २) क) प्रभाकर ३) क) श्रीशिवछत्रपती

**प्र.१ ब) पुढीलपैकी चुकीची जोडी लिहा.**

१) ४) चुकीची जोडी- नॅशनल लायब्ररी – पुणे

२) ४) चुकीची जोडी - बेंजामिन ट्युडेला–जगाचा नकाशा व पृथ्वी गोलाचे आरेखन

३) २) चुकीची जोडी –बोरोबुदुर- राष्ट्रीय वारसास्थळ

**प्र.२ अ) दिलेली संकल्पना चित्र पूर्ण करा. (कोणतेही दोन)**

१) अ) पुरातत्व आ) अभिलेखागार इ) हस्तलिखितांचा अभ्यास ई) पुराभिलेख उ) अक्षरवाटिका शास्त्र ऊ) भाषारचनाशास्त्र ए) नाणकशास्त्र ऐ) वंशावळीचा अभ्यास (ह्यातील कोणतेही ४)

२) अ) जेम्स ऑगस्टस आ) बाळशास्त्री जांभेकर इ)गोपाळ हरी देशमुख ई)कृष्णराव भालेराव

३) अ ) इंडियन म्युझिअम आ) नॅशनल म्युझिअम इ) छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय ई) सालरजंग म्युझिअम

**प्र.२ ब) पुढील संकल्पा स्पष्ट करा. (कोणतेही दोन)**

१) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय , मुंबई:

१) इसवी सन १९०४ साली मुंबईतील काही प्रतिष्ठित नागरिकांनी एकत्र येऊन प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारतभेंटीच्या स्मरणार्थ एक वस्तुसंग्रहालय उभारण्याचा निर्णय घेतला.
२) इसवी सन १९०५ च्या नोव्हेंबर महिन्यात या संग्रहालयाच्या इमारतीची पायाभरणी झाली आणि संग्रहालयाचे नाव प्रिन्स ऑफ वेल्स म्युझिअम ऑफ वेस्टर्न इंडिया असे निश्चित करण्यात आले.
३) इसवी सन १९९८ मध्ये संग्रहालयाचे नाव बदलून 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' असे ठेवण्यात आले.
४) संग्रहालयाची वास्तू इंडो-गोथिक शैलीत बांधलेली आहे.
५) तिला मुंबई शहरातील पहिल्या प्रतीची सांस्कृतिक वारसा इमारत असा दर्जा देण्यात आला आहे.
६) संग्रहालयातील कला, पुरातत्व आणि निसर्गाचा इतिहास अशा तीन वर्गात विभागलेल्या सुमारे पन्नास हजार पुरावस्तू संग्रहित केलेल्या आहेत.

२) लोककलेच्या परंपरा:

१) भारतातील प्रत्येक प्रदेशाच्या वैविध्यपूर्ण अशा लोकगीत, लोकवाद्य, लोकनृत्य, लोकनाट्याच्या परंपरा आहेत.

२) महाराष्ट्रातही लोककलेच्या अनेक परंपरा अस्तित्वात आहेत.

३) या लोककला धार्मिक उत्सव आणि समाजातील जीवन यांचा एक अविभाज्य भाग म्हणून विकसित झाल्या.

४) कोळीनृत्य, तारपा नृत्य, कोकणातील दशावतार, पोवाडा, कीर्तन, जागर-गोंधळ ही त्यांपैकी काही ठळक उदाहरणे आहेत.

३) संज्ञाकोश:

१) इतिहासातील संज्ञा वेगळया काढून त्या समजावून सांगणारे कोश इतिहासात तयार करतात.
२) अभ्यासकांना त्याचा उपयोग होतो.
३) इतिहास विषयाच्या अभ्यासकांना कोशरचनेच्या कामात भरपूर संधी उपलब्ध आहेत.
४) कोणत्याही विषयाचा कोश असो त्याला इतिहासाची जोड आवश्यक आहे.
५) प्रत्येकी विषयाला इतिहास असतो, इतिहास अभ्यासक कोशांच्या अभ्यासातून घटना कोश, दिनविशेष, व्यक्तिकोश, संज्ञाकोश, तयार करण्यात सहभागी होऊ शकतात.

**प्र.३ अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)**

१) १) स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना.

२) सीमाँ-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादी मूलभूत भूमिका सिद्ध केली.

३)स्त्रीवादी इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा अंतर्भाव करण्याबरोबरच इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनांचा पुनर्विचार करण्यावर भर दिला गेला.

४) स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित नोकरी, रोजगार, ट्रेड युनियन, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था स्त्रियांचे कौटुंबिक आयुष्य, यांसारख्या विविध पैलूंचा विचार करणारे संशोधन सुरु झाले.

२) १) कलेचा इतिहास ही एक ज्ञानशाखा आहे. त्या क्षेत्रात संशोधनाच्या आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात .

२) कला वस्तूंच्या खरेदी-विक्रीचे एक स्वतंत्र जग आहे. तिथे कालवस्तूंचे मूल्य ठरवण्यासाठी ती कलावस्तू नकली नाही ना, हे पारखण्याची आवश्यकता असते. त्यासाठी कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता आहे.

३) औद्योगिक क्षेत्र, जाहिरात क्षेत्र, घरांची सजावट, रंगमंचावरील नेपथ्य, चित्रपट आणि दूरदर्शनवरील कार्यक्रम यासाठी आवश्यक असणारे कला, दिग्दर्शन, प्रकाशन मुद्रण, भेटकार्ड, भेटवस्तू इत्यादी सर्वत्र उपयोजित कला क्षेत्रातील जाणकारांची आवश्यकता असते.

३) १) ऑलिंपिक, एशियाड ब्रिटिश राष्ट्रकुल, विंबल्डन यांसारखा स्पर्धामधून खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट, फुटबॉल, लॉन टेनिस इत्यादी सामन्यांचे थेट प्रक्षेपण दूरदर्शन व अन्य वाहिन्यांवरुन जगभर एकाचवेळी केले जाते.
२) ज्या देशांचा त्या खेळात काही सहभाग नाही असे प्रेक्षक सुद्धा त्या खेळांचा आनंद घेत असतात.
३) उदा. क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत अंतिम फेरीत पोहचल्यावर जगभरातील प्रेक्षकांनी सामना पाहिला.
४) या जगभराच्या प्रेक्षकांनी खेळांचे अर्थकारणच बदलून टाकले आहे.
५) हौशी खेळाडू शिकण्यासाठी सामने बघतात.
६) प्रेक्षक मनोरंजनासाठी खेळाचे सामने बघतात.
७) कंपन्या जाहिरातींची संधी म्हणून सामन्यांकडे बघतात.
८) प्रेक्षकांना सामने समजावून देण्यासाठी निवृत्त खेळाडू येतात.
९) म्हणून विसाव्या व एकविसाव्या शतकात खेळांचे आंतरराष्ट्री करण झाले आहेत.

४) १) 'लिओपॉल्ड व्हॉन रांके' यांनी इतिहास संशोधनाची चिकित्सक पद्धती कशी असावी ते सांगितले.
२) मूळ दस्तऐवंजाच्या आधारे प्राप्त झालेली माहिती ही सर्वाधिक महत्त्वाची आहे, यावर त्याने भर दिला.
३) ऐतिहासिक घटनांशी संबधित असणाऱ्या सर्व घटनांची कागदपत्रे आणि दस्तऐवज यांचा कसून शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्याने सांगितले. अशा पद्धतीने ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहचता येणे शक्य आहे असे त्यांने सांगितले.

४) म्हणून त्याच्या विचारांचा प्रभाव एकोणिसाव्या शतकातील इतिहास लेखनाच्या पद्धतीवर प्रामुख्याने दिसतो.

**प्र.४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपेटोमियातील सुमेर संस्कृती मध्ये झाली.

२) सुमेर संस्कृतीतील प्राचीन शिलालेखांचा संग्रह फ्रान्समधील लुव्र या जगप्रसिद्ध संग्रहालयात ठेवलेला आहे.

३) i) सुमेर संस्कृतीतील राजे व त्यांच्या संघर्षाच्या कहाण्या शिलालेखांमध्ये जतन केलेल्या आहेत.

ii) त्यातील सर्वाधिक प्राचीन शिलालेख सुमारे ४५०० वर्षापूर्वी सुमेरमधील दोन राज्यांमध्ये झालेल्या युद्धाची नोंद करणारा असून, तो सध्या फ्रान्समधील लुव्र या जगप्रसिद्ध संग्रहालयात ठेवला आहे.

**प्र.५ पुढीलप्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) १) कलेच्याइतिहासाचे अभ्यासक पत्रकारितेच्या क्षेत्रात ही काम करु शकतात.

२) तिथे कलावस्तूंचे मूल्य ठरवण्यसाठी ती कलावस्तू नकली नाही ना हे, पारखण्याची आवश्यकता असते. त्यासाठी कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

३) कलावस्तूंच्या खरेदी-विक्रीचे एक स्वतंत्र जग आहे.

४) सांस्कृतिक वारशांचे जतन आणि संवर्धन तसेच सांस्कृतिक पर्यटन ही आता नव्याने विकसित होणारी क्षेत्रे आहेत.

५) त्यामध्ये संग्रहालय आणि अभिलेखागार, ग्रंथालय आणि माहिती प्रसारणाचे तंत्रज्ञान, पुरात्वीय संशोधन आणि भारतीय विद्या ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत.

२) १) पूर्वीच्याकाळीराजाला एखादी बातमी संपूर्ण राज्यात पोहचवायची असेल तर त्यासाठी कित्येक दिवस लागत असत.

२) पूर्वी गावोगावी दंवडी पिटवत असत.

३) एकाकडून दुसऱ्याला, दुसऱ्याकडून तिसऱ्याला अशा बातमीचा प्रवास व्हायचा.

४) इजिप्तमध्ये इसवीसन पूर्वकाळात सरकारी आदेशाचे कोरीव लेख सार्वजनिक ठिकाणी लावत असत.

५) सातव्या शतकात चीनमध्ये सरकारी निवेदने सार्वजनिक ठिकाणी वाटत असत.

६) धर्मशाळांमध्ये उतरणारे प्रवासी, फिरस्ते तेथील स्थानिक लोकांना दूरवरच्या बातम्या रंगवून सागंत असत.

७) राजांचे प्रतिनिधी वेगवेगळया ठिकाणी असत. ते ताज्या बातम्या राजदरबारात पाठवत असत.

३) १) तमाशाहाशब्द मुळात पर्शियन भाषेतील आहे.

२) चित्ताला प्रसन्नता देणारे दृश्य असा याचा अर्थ आहे.

३) विविध लोककला आणि अभिजात या कलांचे प्रवाह सामावून घेत अठराव्या शतकापर्यंत विकसित झाला.

४) पारंपरिक तमाशाचे दोन प्रकार आहेत. संगीत बारी आणि ढोलकीचा फड.

५) संगीत बारीमध्ये नाट्यापेक्षा नृत्य आणि संगीतावर अधिक भर दिला जातो.

६) प्राधान्याने नृत्य-संगीताचा समावेश असलेल्या तमाशात कालांतराने ‘वग’ या नाट्यरुपाचा समावेश केला गेला.

७) उत्स्फूर्त विनोदाच्या आधाराने वग रंगत जातो.

८) तमाशाच्या सुरुवातीला गण म्हणजे गणेशवंदना गायली जाते.

९) त्यानंतर गवळण सादर केली जाते.

१०) तमाशाच्या दुसऱ्या भागात मुख्य नाटक म्हणजे वग सादर केला जातो.

११) इच्छा माझी पुरी करा आणि गाढवाचे लग्न यांसारखे मराठी रंगभूमीवर गाजलेले प्रयोग हे तमाशाचे आधुनिक स्वरुप दर्शवतात.

४) १) एकोणिसाव्या शतकातील इतिहासलेखनाच्या पद्धतीवर प्रामुख्याने बर्लिन विद्यापीठातील लिओपॉल्ड व्हॉन रांके यांच्या विचारांचा प्रभाव होता.

२) त्यांने इतिहास संशोधनाची चिकित्सक पद्धती कशी असावी ते सांगितले.

३) मूळ दस्तऐवजांच्या आधारे प्राप्त झालेली माहिती ही सर्वाधिक महत्त्वाची आहे यावर त्याने भर दिला.

४) तसेच ऐतिहासिक घटनांशी संबंधित असलेल्या सर्व प्रकारची कागदपत्रे आणि दस्तऐवज यांचा कसून शोध घेणे अत्यंत

महत्त्वाचे असल्याचे त्याने सांगितले

५) अशा पद्धतीने ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहचता येणे शक्य आहे, असा विश्वास त्याने व्यक्त केला.

६) इतिहासलेखनातील काल्पनिकतेवर त्याने टीका केली.

७) त्याने जागतिक इतिहासाच्या मांडणीवर भर केली.

८) 'द थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी' आणि ' द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या ग्रंथामध्ये त्याच्या विविध लेखांचे संकलन आहे.

## राज्यशास्त्र

**प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) ब) १८ २)ड) जनाधार

**प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)**

१) हे विधान **<u>बरोबर</u>** आहे; कारण –

१) सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे हे लोकशाहीचे ध्येय असते.
२) कोणताही भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी दिल्याने सर्व सामाजिक घटक मुख्य प्रवाहात सामील होतात.
३) लोकशाहीत सर्व समाजघटकांनी सामावून घेण्याची प्रक्रिया होत असल्यामुळे समाजातील संघर्षही कमी होतात.

२) हे विधान **<u>बरोबर</u>** आहे; कारण –

१) बहुमताने अधिकारावर आलेले सरकार मुदतीआधीच पक्षफुटीमुळे अल्पमतात येऊ शकते.
२) काही वेळा एका पक्षाला बहुमत मिळाले नसल्यास दोन किंवा अनेक पक्षांची आघाडी करुन सरकार स्थापन केले जाते. परंतु मुदतीआधीच आघाडीत फूट पडून सरकार अल्पमतात येते.
३) अल्पमतात आलेल्या सरकारला राजीनामा द्यावा लागतो. अशा वेळी पर्यायी सरकार स्थापन करण्यची शक्यता नसल्यास लोकसभा वा विधानसभा मुदतपूर्व बरखास्त करावी लागते. अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाला मध्यावधी निवडणुका घ्याव्या लागतात.

३) हे विधान **<u>बरोबर</u>** आहे; कारण –

१) राजस्थानसारख्या वाळवंटी प्रदेशात डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी नद्या पुनरुज्जीवित केल्या.
२) ‘तरुण भारत संघ’ ही संघटना स्थापून शेकडो गावांमध्ये ‘जोहड’ म्हणजे मातीचे बंधारे घालून नद्या अडवल्या.
३) देशभर पदयात्रा काढून जलसंवर्धन, वन्यजीवन संवर्धन, नद्या पुनरुज्जीवित करणे अशा मोहिमा राबवल्या.
४) डॉ. राणा यांनी देशभर ११ हजार ‘जोहड’ बांधले. सतत ३१ वर्षे केलेल्या या जलक्रांतीमुळे त्यांना ‘भारताचे जलपुरुष’ या नावाने ओळखले जाते.

**प्र.८ अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही दोन)**

१) पक्षपद्धती -

१) ज्या देशात दीर्घकाळ एकाच पक्षाच्या हाती सत्ता असते आणि अन्य पक्षांचे अस्तित्व नसते किंवा त्यांचा प्रभाव नसतो; त्या पद्धतीला ‘एकपक्षीय पद्धती’ असे म्हणतात. चीन मध्ये ही पद्धती अस्तित्वात आहे.
२) काही देशांत दोन पक्ष प्रभावी असतात व ते आलटून-पालटून स्वतंत्रपणे सत्तेवर येतात, तेव्हा त्या पद्धतीला ‘द्विपक्ष पद्धती’ असे म्हणतात. ही पद्धती अमेरिका, इंग्लंड येथे आहे.
३) जेथे अनेक पक्ष अस्तित्वात असून ते एकमेकांशी सत्तास्पर्धा करतात, सर्वांचा कमी-अधिक राजकीय प्रभाव असतो; अशा पद्धतीला ‘बहुपक्षीय पद्धती’ असे म्हणतात. ही पद्धती भारतात आहे.
४) बहुपक्षीय पद्धतीमध्येच लोकशाही विकसित होते.

२) राजकारणाचे गुन्हेगारीकरण

१) राजकीय व्यवस्थेत गुन्हेगारी प्रवृत्तींचा समावेश होणे, म्हणजेच राजकारणाचे गुन्हेगारीकरण होय. हे गुन्हेगारीकरण विविध मार्गांनी होत असते.


२) पैसा आणि गुंडगिरी यांच्या जोरावर पक्ष किंवा उमेदवार मतदारांमध्ये दशहत निर्माण करतात.

३) निवडणुकांच्या काळात हिंसाचार घडवून आणतात. राजकीय पक्ष अशा प्रभावशाली व्यक्तींना निवडणूकीचे तिकीट देतात.

४) असे उमेदवार निवडून आल्यावर पुन्हा हीच कामे करतात. आर्थिक घोटाळे करतात. विरोधकांना त्रास देतात. काही वेळा त्यांच जीवही घेतात. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले की लोकशाही कमकुवत होते.

**प्र.८ ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणतेही एक)**

१) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा.




२) अ) सतीच्या प्रथेला विरोध आ) विधवा पुनर्विवाह इ) स्त्री शिक्षण

ई) बालविवाहास विरोध उ) स्त्रियांना मतदानाचा अधिकार (ह्यातील कोणतेही ४)

**प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) नागरिकांचे अधिकार आणि लोकशाही व्यवस्था यांच्यासंबंधात भारतीय न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयांतून आपली पुढील महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे –

१) संविधानाचा अर्थ लावताना संविधानाची मूळ उद्दिष्टे आणि संविधानकारांचे हेतू यांन न्यायालयांनी नेहमीच प्राधान्य दिले.

२) सामाजिक न्याय व समता या उद्दिष्टांच्या दिशेने प्रगती करण्यात न्यायालयांनी महत्त्वपूर्ण निर्णय दिले.

३) संविधानातील तरतुदींमध्ये बदल करण्याचा अधिकर मान्य करतानाच तिच्या मूळ चौकटीला धक्का लागणार नाही; अशी भूमिका घेतली.

४) खाजगीपणाचा हक्क हा मूलभूत हक्क असल्याचा निर्वाळा दिला.

2) १९८५ साली स्थापन झालेल्या आसाम गण परिषदेची पुढील उद्दिष्टे आहेत –

१) आसामचे सांस्कृतिक, भाषिक व सामाजिक वेगळेपण जपणे.

२) आसामच्या आर्थिक विकासासाठी प्रयत्न करणे.

३) आसामतील निर्वसितांचे प्रश्न सोडवणे.

४) आसामच्या सर्वांगीण विकासासाठी १९८५ साली सरकारशी वाटाघाटी करुन ‘आसाम करार’ करण्यात आला.